Movie: Kela Ishara Jata Jata
Year: 1965

Song: Dhama Dham Dhol Ra
Lyricist: Jagdish Khebudkar

ढमा ढम ढोल रं
ढमा ढम झांजरी
ढमा ढम ढोल रं
ढमा ढम झांजरी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

उदयाच्या पोटाची काळजी कशाला
उदयाच्या पोटाची काळजी कशाला
आभाळ पांघरु दगड उशाला
गाळूनी घाम असा मागूया भाकरी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

सोळातली नार मी
रंग माझा बैंगनी
सोळातील नार मी
रंग माझा बैंगनी
उर होई खाली वर
सूरत माझी ठेंगनी
जवानी ने तोडली रं
रानफूल डोंगरी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

वीसावं वरीस
आलया भराला
वीसावं वरीस
आलया भराला

भिंगाची चोली रं
दाटते उराला
सोन्याचा माड असा
शंभर नंबरी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

हाता मधी घेतली
आडवी तिवाटी
हाता मधी घेतली
आडवी तिवाटी
तारे वरी डोलता
नाचतो कोल्हाटी
माणसं झाली का रं
कावरी बावरी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

कोल्हाटी अंगाची वाकली कमान
कोल्हाटी अंगाची वाकली कमान
कोल्हांटी मारतो गिरक्या घेऊन
घरटी भवतो शेजारी पाजारी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

काठी भली लांबडी दातांनी धरीतो
काठी भली लांबडी दातानी धरीतो
वाऱ्यावरी घुमूनी रिंगण घालीतो
चढूनी उतरी तो पायरी पायरी

PlanetRead

Literacy for a Billion

नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

जात अशी रांगडी
भोळी तशी भाबडी
जात अशी रांगडी
भोळी तशी भाबडी
भल्या संग भली रं
बूऱ्यासंग वाकडी
पायाला आमुच्या रं
बांधली भिंगरी
नाचतो डोंबारी रं

नाचतो डोंबारी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी
नाचतो डोंबारी रं
नाचतो डोंबारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*